MHAU060022382022

**सीव्हील.एम.ए.नं.१०५/२०२२.**
**दत्तु तुकाराम उर्फ बाबुराव चिंतामणी वि. महाराष्ट्र शासन.**

**निशाणी १ वरील आदेश**
**( दिनांक २०.१२.२०२२ रोजी आदेश घोषीत )**

अर्जदार यांनी सदरचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसा दाखला मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**२.** अर्जातील थोडक्यात हकीकत अशी आहे की, अर्जदार हे मौजे शफेपुर, ता. कन्नड येथील कायमस्वरुपी रहिवाशी आहेत. तुकाराम उर्फ बाबुराव चिंतामणी हे दिनांक ११.०८.१९८३ रोजी मौजे दहीगाव, ता. शेवगांव, जि. अहमदनगर येथे अपघातात मयत झाले आहेत. मयत तुकाराम उर्फ बाबुराव चिंतामणी यांना मृत्यू समयी वारस पत्नी गिताबाई तुकाराम उर्फ बाबुराव चिंतामणी व अर्जदार दत्तु तुकाराम उर्फ बाबुराव चिंतामणी हेच वारस होते. मयताची पत्नी गिताबाई ही दि.२३.११.१९८५ रोजी मौजे पिशोर, ता. कन्नड येथे मरण पावल्या आहे. अर्जदार हे मयत तुकाराम उर्फ बाबुराव चिंतामणी यांचे कायदेशीर वारस असून त्यांच्या शिवाय इतर कोणतेही वारस त्यांना नाही. अर्जदारांना महसुल विभाग, तहसील कार्यालय, तलाठी कार्यालय, शासकीय, निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

**३.** दैनिक वर्तमानपत्र 'आदर्श गावकरी' दिनांक ०१.११.२०२२ नुसार जाहीर हरकती मागविल्या होत्या, परंतू नमुद मुदतीत कुणीही हरकती घेतल्या नाहीत. तसेच गैरअर्जदार व तहसिल कार्यालय कन्नड, पंचायत समीती, नगर परिषद यांना नोटीसची बजावणी केली. तसेच दिवाणी न्यायालय कन्नड यांचे नोटीस बोर्डावर नोटीस डकविण्यात आली. परंतू नमुद मुदतीत कुणीही हरकती घेतल्या नाहीत.

**४.** अर्जदार यांनी स्वतःचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र (नि.क्र.१३) तसेच साक्षीदार क्रं. २ चे पुरावयाचे

प्रतिज्ञापत्र (नि.क्र.१४) अभिलेखावर दाखल करुन अर्जातील नमुद मजकूर पुनर्कथीत केला आहे. अर्जदारांनी पुरावा बंद केल्याची पुरशीस (नि.क्रं.१५) अभिलेखावर दाखल केली आहे. तसेच, यादी निशाणी क्र. ४ लगत खालील कागदपत्रांच्या प्रती दाखल केल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मयत तुकाराम शंकर चिंतामणी यांचे गट विकास अधिकारी पंचायत समिती दहिगांव यांनी निर्गमीत केलेले मृत्यू छायांकित प्रमाणपत्र | नि.क्र.४/१. |
| २. | मयत गिताबाई बाबुराव चिंतामणी यांचे ग्रामविकास अधिकारी पिशोर, ता. कन्नड जि. औरंगाबाद यांनी निर्गमीत केलेले मुळ मृत्यु प्रमाणपत्र, | नि. क्र. ४/२ |
| ३. | ग्रामविकास अधिकारी पिशोर ता. कन्नड जि. औरंगाबाद यांनी निर्गमीत केलेला गाव नमुना नं.८ ची मुळ प्रत. | नि.क्र. ४/३. |
| ४. | अर्जदाराचे आधारकार्डाची व्हेरिफाईड प्रत . | नि.क्र.४/४ . |
| ५. | दैनिक ''आदर्श गावकरी'' पेपर दि. ०१.११.२०२२ रोजीची प्रत. | नि.क्र. १२ सोबत. |

५. उपरोक्त कारणावरुन अर्जदार व साक्षीदार क्रं. २ यांचे पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रानुसार व उपरोक्त नमुद कागदपत्रानुसार अर्जदार हे मयत तुकाराम उर्फ बाबुराव चिंतामणी यांचे वारस असल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न होते. अर्जदार यांनी दाखल केलेल्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रावर विश्वास ठेवून तसेच सदर कामी कोणीही सदरच्या अर्जास हरकत घेतली नाही, म्हणून अर्जदार यांना वारसा दाखला देण्याच्या कामी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ चे तरतुदी प्रमाणे कोणतीही बाधा येत नाही. सबब, अर्जदार यांना वारसा दाखला देणे क्रमप्राप्त ठरेल. म्हणून खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्जदार दत्तु तुकाराम उर्फ बाबुराव चिंतामणी हे मयत तुकाराम उर्फ बाबुराव चिंतामणी यांचे वारस असल्याबाबतचा दाखला दिवाणी नियमावलीचे परिच्छेद क्र. ३१२ च्या टिप्पणीसह देण्यात यावा.

२. अर्जदारांनी कायद्याप्रमाणे मुद्रांक द्यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by ANNAPURNA ISHWARA AWATI
Date: 2022.12.21 15:49:22 +0530

(अ. ई. आवटी)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कन्नड.

दिनांक २०.१२.२०२२
कन्नड.

**शेरा**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. न्यायनिर्णय/आदेश फाईलमधील मजकूर हा मूळ न्यायनिर्णय/आदेशा तील मजकुराशी शब्द–न–शब्द सारखा आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव (निम्न श्रेणी) | – यो. सु. माळी, |
| कोर्टाचे नांव | – (श्रीमती. अ. ई. आवटी), सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), तथा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कन्नड, |
| दिनांक | – २०.१२.२०२२ |
| पिठासीन अधिका–यांनी न्यायनिर्णय/आदेशावर सही केलेचा दिनांक | – २०.१२.२०२२ |
| न्यायनिर्णय/आदेश अपलोड केलेचा दिनांक | – २१.१२.२०२२ |